Inward No 76
Date of Receipt 24/8/2023

दि. 24/08/2023

मा. प्राचार्य,
वराडकर - बेलोसे महाविद्यालय
दापोली, जि - रत्नागिरी

विषय :- रुग्ण सहाय्यक पूर्तता अहवाल ---
संदर्भ :- 03 ऑगस्ट रोजी रेजि. नं. 124/23-24 चे पत्र

महोदय,

आपल्या महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यासकेंद्र (7302 A) मध्ये 2023-24 या शैक्षणिक वर्षामध्ये रुग्ण सहाय्यक (Patient Assistant) हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रथम प्रस्ताव विद्यापीठाकडे 17 मे 2023 रोजी ई-मेल द्वारे सादर करण्यात आला. त्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे नवीन प्रस्ताव तयार करुन 23 मे 2023 रोजी विभागीय केंद्र कोल्हापूर येथे सादर करण्यात आला. रुग्ण सहाय्यक कोर्स सुरु होण्यासाठी दापोलीतील तीन डॉक्टरांचे करार करण्यात आले. त्यावरील खर्च 1500 रुपये झाला. व विद्यापीठाकडे ऑनलाईन कोर्स फी 5000/- रुपये जमा करण्यात आली, दि. 7 जुलै 2023 रोजी विद्यापीठामार्फत ऑनलाईन व्हेरीफिकेशन करण्यात आले. त्यानंतर 3 ऑगस्ट 2023 रोजी अभ्यासकेंद्र प्रोसेस फी 5000/- रुपये भरण्यात आली विद्यापीठाकडून 15 ऑगस्टपर्यंत कोर्स मान्यता पत्र पाठविले असे सांगण्यात आले. परंतु आजपर्यंत कोर्स सुरु करण्याचे पत्र विद्यापीठाकडून प्राप्त झाले नाही.

रुग्ण सहाय्यक या कोर्सची फी गेल्यावर्षीपर्यंत 6 हजार इतकी होती. पण यावर्षी विद्यापीठाने वाढवून 9000/- रुपये इतकी फी केली आहे.

आपल्या अभ्यासकेंद्राचे लिंकमध्ये नाव फक्त दिसत आहे. ही लिंक 18 ऑगस्टपासून सुरु झाली आहे. तरी अहवालाचा स्विकार करावा ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
(सही)
श्री लक्ष्मीकांत पाटील